


मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड मानवहत्येपेक्षा गंभीर » पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



करुण नायरचे भारतीय संघात कमबॅक? » पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, २८ मार्च २०२५ । पाने ४ । ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 204 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 28 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### अभिनेत्री रान्याच्या कोठडीत वाढ

बंगळुरू, दि. २७ : सोन्याच्या तस्करी प्रकरणात अटकेत असलेली कन्नड अभिनेत्री रान्या राव हिचा जामीन अर्ज गुरुवारी (दि.२७ ) सत्र न्यायालयाने फेटाळला. त्यानंतर तिला न्यायालयीन कोठडीतच ठेवण्यात येणार असल्याचे न्यायालयाने सांगितले. रान्या राव हिचा जामीन अर्ज फेटाळण्याची ही तिसरी वेळ आहे. अभिनेत्री आता कर्नाटक उच्च न्यायालयात जाणार का?, असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे. अभिनेत्री रान्या रावला ३ मार्चच्या रात्री केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावर (केआयए) महसूल गुप्तचर संचालनालयाच्या (डीआरआय) अधिकाऱ्यांनी सोन्याच्या तस्करीच्या आरोपाखाली अटक केली होती. त्यानंतर ४ मार्चला तिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनानली होती. दरम्यान बंगळूरमधील न्यायालयाने तिचा जामीन अर्ज आज (दि.२७) फेटाळला. त्यामुळे तिला कोणताही दिलासा मिळालेला नाही. तिच्यावर १४.८ किलो सोने ठेवल्याचा आरोप होता.

------------

### पीएफमधून पैसे काढणे झाले सोपे

नवी दिल्ली, दि. २७ : कर्मचारी भविष्य निधी संघटनेने (ईपीएफओ) काही महत्त्वाचे बदल केले आहेत, ज्यामुळे सदस्यांसाठी क्लेम सेटलमेंट, म्हणजेच प्रोविडेंट फंडमधून पैसे काढण्याची प्रक्रिया अधिक सोपी झाली आहे. केंद्र सरकारने ही माहिती संसदेत दिली. सरकारने सांगितले आहे की, कर्मचारी भविष्य निधीचे क्लेम सेटलमेंट सुलभ करण्यासाठी ऑटो-मोड प्रोसेसिंग आणि डेटा सेंट्रलायझेशन यांसारख्या अनेक तांत्रिक सुधारणा करण्यात आल्या आहेत. या बदलांमुळे एझऋक्लेम सेटलमेंटची प्रक्रिया वेगवान तर होणार आहेच त्याचबरोबर सदस्यांना कार्यालयात जाऊन कागदपत्रे जमा करण्याच्या त्रासातूनही मुक्ती मिळेल. श्रम आणि रोजगार राज्यमंत्री शोभा करंडलजे यांनी राज्यसभेत लेखी उत्तर सादर केले. त्यात म्हटलंकी, ईपीएफओने ॲडव्हान्स क्लेमच्या ऑटो-मोड प्रोसेसिंगची मर्यादा १ लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. पूर्वी ही सुविधा केवळ आजारपण आणि रुग्णालयात भरतीसाठी उपलब्ध होती. मात्र, आता ती हाऊसिंग, शिक्षण आणि विवाह यांसारख्या इतर महत्त्वाच्या गरजांसाठीही लागू करण्यात आली आहे.

---------

### विदेशातून आयात कार महागणार

वॉशिंग्टन, दि. २७ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरात 'टॅरिफ वॉर' सुरू केले आहे. याचाच पुढचा अध्याय पहायला मिळाला असून ट्रम्प प्रशासनाने अमेरिकेमध्ये आयात होणाऱ्या सर्व वाहनांवर टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे. व्हाईट हाऊसने याबाबत एक आदेश जारी करत विदेशातून आयात होणाऱ्या वाहनांवर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली. ट्रम्प प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे जगभरातील ऑटो सेक्टरमध्ये खळबळ उडाली असून यामुळे अमेरिकेमध्ये विदेशी कारच्या किंमती वाढणार आहेत. सत्तेत आल्यापासून डोनाल्ड ट्रम्प एका मागोमाग एक धडक निर्णय घेत आहेत. अमेरिकेतली निर्वासितांना बाहेरचा रस्ता दाखवण्यासह त्यांनी जगभरात टॅरिफ वॉर सुरू केले. अमेरिकेच्या वस्तुंवर लावण्यात शुल्काएवढेचे शुल्क विदेशातून आयात होणाऱ्या वस्तुंवर लावण्याचा इशारा त्यांनी दिला होता. आता त्यांनी विदेशातून आयात होणाऱ्या सर्व वाहनांवर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केली.

# बेकायदा बांधकामे १५ दिवसांत हटवा

## उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार सरकारने बजावल्या नोटिसा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पर्वरी, दि. २७ : उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बेकायदा बांधकामांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. राष्ट्रीय व राज्य महामार्गाच्या बाजूला असलेल्या बेकायदा व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा बजावण्यात आल्या असून, १५ दिवसांत स्थलांतर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांच्या अध्यक्षतेखाली पर्वरी येथील मंत्रालयात यासंदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली.**

बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या आदेशांचा सरकार अभ्यास करत आहे. लोकांच्या हितासाठी आवश्यक असल्यास कायद्यात सुधारणा केली जाईल. मात्र, सद्यस्थितीत न्यायालयाच्या निर्देशानुसारच कारवाई केली जात आहे.

या बैठकीला महसूल मंत्री बाबूश मोन्सेरात, पर्यटनमंत्री रोहन खंवटे, कायदा मंत्री आलेक्स सिक्वेरा आणि संबंधित विभागांचे सचिव तसेच अधिकारी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात पालिका, पंचायती आणि कोमुनिदादींना त्यांच्या अधिकार क्षेत्रातील अतिक्रमण तसेच अनधिकृत बांधकामांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. परिणामी, काही पंचायतींनी अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण सुरू केले असून, नोटिसा बजावण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.राज्याचे ॲडव्होकेट जनरल देविदास पांगम यांनी उच्च न्यायालयात आश्वासन दिले आहे की, राष्ट्रीय आणि राज्य महामार्गालगत असलेली अनधिकृत व्यावसायिक आस्थापने प्रथम नोटिसा देऊन हटवली जातील.राज्यातील अनधिकृत बांधकामे आणि मालकी हक्काच्या प्रश्नांवर राज्य सरकार सक्रिय असून, न्यायालयाच्या निर्देशानुसार आवश्यक ती सर्व उपाययोजना केल्या जातील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राज्य सरकारने गोवा अनधिकृत बांधकाम नियमितीकरण कायदा, २०१६ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे शहरी भागात १,००० चौरस मीटर आणि ग्रामीण पंचायती क्षेत्रात ६०० चौरस मीटरपर्यंतच्या अनधिकृत बांधकामांचे नियमितीकरण सुलभ होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करताना केली. त्यांनी सांगितले की, गोव्यातील कायदेशीर जमीन मालकी नसलेल्या नागरिकांना मालकी हक्क प्रदान करण्यासाठी स्वतंत्र धोरण आखले जाईल. तसेच शेतीसाठी जमीन कसणाऱ्या, पण अधिकृत मालकी हक्क नसलेल्या शेतकऱ्यांसाठीही विशेष योजना तयार केली जाईल.

या उपाययोजनांसाठी अर्थसंकल्पात महसूल विभागाला १३६.४१ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. उच्च न्यायालयाने स्वतःहून घेतलेल्या जनहित याचिकेमध्ये राज्यभरातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री सावंत यांनी विधानसभेत सांगितले की, सरकार उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करीत आहे आणि कायदा पाळणाऱ्या

पान २ ▶

# पीडित महिलांसाठी कोणतीही भरपाई योजना नाही : काँग्रेस

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७ :** राज्यात महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये होत असलेल्या वाढीबाबत आणि सरकारच्या उदासीनतेवर टीका करत गोवा प्रदेश महिला काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. प्रतीक्षा खलप यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी अर्थसंकल्पात विशेष निधीची तरतूद करण्याची मागणी केली आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. खलप यांनी वन-स्टॉप सेंटर्सद्वारे किती बलात्कार पीडितांना मदत करण्यात आली याची माहिती सरकारकडून मागितली. त्यांच्यासमवेत जीपीएमसी सरचिटणीस लिबेरटा मदेरा आणि कार्यकारी सदस्या ॲड. लॅविना डिकॉस्टा उपस्थित होत्या.

२०२४ मध्ये महिलांविरोधातील ३६५ गुन्ह्यांची नोंद झाली, म्हणजेच दररोज सरासरी एक घटना घडत आहे. २०२३ मध्ये ही संख्या २८८ होती. याशिवाय, काही प्रकरणे दबली जातात, तर अनेक पीडित लाज आणि मानसिक आघातामुळे तक्रार दाखल करत नाहीत. बलात्कार, घरगुती हिंसाचार, छेडछाड यांसारख्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यातील १०६ प्रकरणे बलात्काराच्या आहेत. अशा परिस्थितीत सरकारने महिलांच्या सुरक्षेसाठी कोणती ठोस पावले उचलली आहेत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

डॉ. खलप यांनी सांगितले की, २०१५ मध्ये महिलांना संरक्षण आणि मदत करण्यासाठी दोन्ही जिल्ह्यांमध्ये वन-स्टॉप सेंटर्स सुरू करण्यात आले. या केंद्रांमध्ये समुपदेशन तसेच कायदेशीर आणि वैद्यकीय मदतीची सुविधा होती. मात्र, आता या केंद्रांची स्थिती चिंताजनक असून, पीडित महिलांना थेट जिल्हा रुग्णालयात जावे लागते. अशा महिलांना मानसिक आणि शारीरिक त्रास होतो. ग्रामीण आणि शहरी भागातील आरोग्य केंद्रे अशा प्रकरणांना हाताळण्यासाठी सक्षम असली पाहिजेत. तसेच, त्याठिकाणी प्रशिक्षित कर्मचारी असणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.

पोलिस, वैद्यकीय पथके आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वयाचा पूर्ण अभाव आहे. पीडित महिलांना वन-स्टॉप सेंटरची सुविधा मिळावी, जेणेकरून त्या कोणत्याही वेळी मदतीसाठी जाऊ शकतील. तसेच, पोलिसांकडून त्यांना अडथळे येऊ नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या अर्थसंकल्पात पीडित महिलांसाठी कोणतीही भरपाई योजना नसल्याबाबत टीका करताना डॉ. खलप म्हणाल्या, महिलांचा वापर केवळ मतांसाठी केला जात आहे. बाल हक्क आयोगालाही गेल्या दहा महिन्यांपासून अध्यक्ष नाही. महिला आणि बालविकास विभागाला केंद्राकडून ६० टक्के निधी मिळतो, उर्वरित निधी राज्य सरकार देत असते. मात्र, आजपर्यंत किती पीडितांना प्रत्यक्ष लाभ मिळाला, याचा कुठेही उल्लेख नाही. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था कोलमडली असून गृह विभाग अपयशी ठरल्याचा आरोप करत डॉ. खलप म्हणाल्या, महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर आम्ही ३ एप्रिल रोजी 'नारी न्याय आंदोलन' आयोजित करणार आहोत. या आंदोलनाच्या माध्यमातून आम्ही महिलांच्या हक्कांसाठी लढा उभारू.

# ९० टक्के विद्यार्थी पास; मुलींची कामगिरी चमकदार

## यंदा बारावीचा निकाल ९०.६४ टक्के | उत्तीर्णात गतवर्षाच्या तुलनेत ५ टक्के वाढ

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. २७ :** गोवा माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने गुरुवारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर केला. यावर्षी मुलींनी उज्ज्वल यश संपादन करत ९२.४२% उत्तीर्णतेचा टक्का गाठला, तर मुलांचा उत्तीर्णतेचा दर ८८.६९% होता. निकाल जाहीर करताना शिक्षण मंडळाचे अध्यक्ष भागीरथ शेट्ये यांनी सांगितले की, यावर्षी एकूण उत्तीर्णतेचे प्रमाण ९०.६४% इतके होते, जे मागील वर्षाच्या तुलनेत पाच टक्क्यांनी वाढले आहे.

या परीक्षेसाठी एकूण १७,६८६ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १६,०३० नियमित विद्यार्थी आणि १,६५६ सुधारित विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तिन्ही शाखांमध्ये मुलींच्या कामगिरीने आघाडी घेतली आहे.

**मुलींची सरासरी उत्तीर्णता:** ९२.४२ टक्के (८,५२५ पैकी ९,२२४)

**मुलांची सरासरी उत्तीर्णता:** ८८.६९ टक्के (७,५०५ पैकी ८,४६२)

शाखेनुसार उत्तीर्णतेचा आढावा घेतला असता, सर्वाधिक निकाल वाणिज्य आणि कला शाखेत नोंदवण्यात आला.

**वाणिज्य शाखा:** ९३.३१%

कला शाखा: ९३.०३%

विज्ञान शाखा: ९१.०३%

**व्यावसायिक अभ्यासक्रम:** ८२.७१%

शाखेनुसार परीक्षार्थींची आणि सुधारित विद्यार्थ्यांची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे:

| शाखा | एकूण विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | सुधारणा आवश्यक | राखीव निकाल |
|---|---|---|---|---|
| कला | ४,०६८ | ३,७०३ | ३६५ | १ |
| वाणिज्य | ५,०८५ | ४,७४५ | ३४० | ० |
| विज्ञान | ६,०८६ | ५,५५८ | ५२८ | १ |
| व्यावसायिक | २,४४७ | २,०२४ | ४२३ | १ |

यावर्षीच्या निकालात एकूण पाच टक्क्यांची वाढ झाल्याने शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा सकारात्मक आढावा घेतला आहे. उच्च शिक्षणाच्या संधी अधिक व्यापक व्हाव्यात यासाठी शैक्षणिक धोरणांमध्ये सुधारणा केली जाईल, असे शेट्ये यांनी स्पष्ट केले.

# ओल्ड गोव्यातील उत्खननात ऐतिहासिक दुर्मिळ ठेवा चोरीला?

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. २७ :** गोवा आणि दमणच्या आर्चडायोसीसने (आर्चबिशपचे अधिकारक्षेत्र) स्पष्ट केले आहे की, ओल्ड गोवा पंचायत येथे प्रस्तावित प्रसाद योजनेच्या अंमलबजावणीसाठी कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) जारी करण्यात आलेले नाही. या पार्श्वभूमीवर, सेव्ह ओल्ड गोवा कृती समितीने ऐतिहासिक महत्त्वाच्या वस्तूंची चोरी रोखण्यासाठी तातडीने एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे.

सेव्ह ओल्ड गोवा कृती समितीचे समन्वयक पीटर व्हिएगस यांनी हेराल्ड मीडियाशी संवाद साधताना सांगितले, सरकार मॉल उभारणीबाबत अफवा पसरविणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांना निर्देश देणार असल्याचे सांगत आहे. मात्र, वस्तुस्थिती अशी आहे की, स्थानिक संस्थांची परवानगी न घेता उत्खनन करणाऱ्या आणि ऐतिहासिक वस्तूंची चोरी करणाऱ्यांविरोधात गुन्हा नोंदवला पाहिजे.

ते पुढे म्हणाले की परवानगी होती की नाही, हा प्रश्न गौण आहे. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अशा संवेदनशील क्षेत्रात उत्खनन करण्याची परवानगी कोणी दिली? कंत्राटदाराला प्राचीन स्थळांवर बांधकाम करण्याची मुभा कोणी दिली? ऐतिहासिक वस्तू चोरीस गेल्या आहेत आणि त्या परत मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.

व्हिएगस यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, पर्यटन विभाग दिल्लीतून परवानग्या घेत असला तरी, स्थानिक प्रशासनाच्या सल्लामसलतीशिवाय हा प्रकल्प राबवला जात आहे. हे धार्मिक संस्थांच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्यासारखे आहे. प्रसाद योजनेत प्रस्तावित अनेक सुविधा आधीच अस्तित्वात आहेत, मात्र, स्थानिक व्यावसायिकांना डावलून प्रकल्पाचे नियंत्रण व्यावसायिक हितसंबंध असलेल्या व्यक्तींना दिले जात आहे.

ओल्ड गोव्यातील वारसा जपण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या ग्लेन कॅब्राल यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, सरकार योजना आखताना स्थानिकांना विश्वासात घेत नाही. जेव्हा नागरिक आक्षेप घेतात, तेव्हा त्यांना दोष दिला जातो.त्यांनी स्पष्ट केले की, २०20 मध्येच स्थानिकांनी या प्रकल्पाला विरोध केला होता. आरंभी २००० चौरस मीटर क्षेत्रावर प्रकल्प राबविण्याचा विचार होता, मात्र विरोधानंतर तो १००० चौरस मीटरपर्यंत कमी करण्यात आला. विधानसभेत सादर करण्यात आलेला सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) ग्रामसभेत कधीही चर्चेसाठी मांडण्यात आलेला नाही. त्यामुळे आम्ही हा प्रकल्प होऊ देणार नाही.

प्रसाद योजनेअंतर्गत प्रस्तावित प्रकल्प वादाच्या भोवऱ्यात सापडला असून, निदर्शकांनी प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. ऐतिहासिक तोफगोळ्यांसह इतर मौल्यवान वस्तू आढळल्याचे सांगण्यात आले आहे, मात्र अनधिकृत उत्खनन आणि बांधकामामुळे हा सांस्कृतिक वारसा धोक्यात आल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे. स्थानिक रहिवासी आणि सेव्ह ओल्ड गोवा कृती समितीच्या सदस्यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याबाबत प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमेरिकेत भारताच्या 'रॉ' संस्थेवर बंदीची मागणी

## भारताने अहवाल फेटाळला | डोनाल्ड ट्रम्प यांच्या भूमिकेकडे लक्ष

**वॉशिंग्टन/नवी दिल्ली, दि. २७ :**

भारताची गुप्तचर संस्था रिसर्च अँड नालिसिस विंग 'रॉ' वर बंदी घालण्याची मागणी अमेरिकेतून करण्यात आली आहे. यूएस कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलिजियस फ्रीडम (यूएससीआयआरएफ) ने आपल्या २०२५ च्या वार्षिक अहवालात ही शिफारस केली आहे. अहवालात दावा करण्यात आला आहे की, भारतामध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा स्तर सतत खालावत चालला असून धार्मिक अल्पसंख्याकांवरील हल्ले आणि भेदभाव वाढले आहेत. तथापि, भारताने हा अहवाल पक्षपाती आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे म्हणत फेटाळून लावला आहे.

यूएससीआयआरएफ हा १९९८ च्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य कायद्यांतर्गत स्थापन झालेला अमेरिकी फेडरल आयोग आहे, जो जागतिक धार्मिक स्वातंत्र्याच्या स्थितीचे निरीक्षण करतो आणि सरकारला धोरणात्मक शिफारसी करतो.

यंदाच्या अहवालात भारताला विशेष चिंता असलेल्या १६ देशांच्या यादीत स्थान देण्याची शिफारस करण्यात आली आहे. अहवालाच्या २२ व्या आणि २३ व्या पानांमध्ये यासंदर्भातील सविस्तर माहिती देण्यात आली आहे. अहवालात असा दावा करण्यात आला आहे की, भारत सरकार परदेशातही धार्मिक अल्पसंख्याकांविरुद्ध कारवाई करत आहे. विशेषतः, शीख समुदायाच्या सदस्यांना लक्ष्य केले जात आहे.

'रॉ' संदर्भात अहवालात म्हटले आहे की,२०२३ मध्ये न्यूयॉर्कमध्ये एका अमेरिकी शीख कार्यकर्त्याच्या हत्येचा प्रयत्न करण्यात आला होता. कॅनडाच्या गुप्तचर यंत्रणेच्या अहवालानुसार, या कटात ठथ चे अधिकारी आणि सहा मुत्सद्दी सामील होते. या पार्श्वभूमीवर, यूएससीआयआरएफ ने अमेरिकन सरकारला 'रॉ' वर निर्बंध घालण्याची शिफारस केली आहे. धार्मिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांवर कठोर कारवाई करावी. यामध्ये त्यांच्या मालमत्तेवर निर्बंध लावणे किंवा त्यांना अमेरिकेत प्रवेश नाकारणे यांचा समावेश असावा, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या अहवालावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी स्पष्ट शब्दांत अहवाल फेटाळला. आम्ही यूएससीआयआरएफ चा २०२५ चा वार्षिक अहवाल पाहिला आहे. तो पुन्हा एकदा पक्षपाती आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे स्पष्ट होते. भारताच्या बहुसांस्कृतिक आणि लोकशाही संरचनेचे चुकीचे चित्रण करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यांनी असेही स्पष्ट केले की,भारत हा १.४ अब्ज लोकसंख्येचा देश असून येथे सर्व धर्मांच्या लोकांना समान हक्क मिळतात. धार्मिक स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर भारताच्या स्थितीबाबत अपप्रचार पसरवण्याचे प्रयत्न यापूर्वीही झाले आहेत आणि त्यांना कोणतेही तथ्यात्मक आधार नाहीत. परराष्ट्र मंत्रालयाने पुढे म्हटले आहे की, भारत एक मजबूत लोकशाही राष्ट्र आहे, जिथे धार्मिक सहिष्णुतेला महत्त्व आहे. त्यामुळे यूएससीआयआरएफ च्या हेतूंवरच संशय व्यक्त केला पाहिजे.

यूएससीआयआरएफच्या या अहवालानंतर भारत आणि अमेरिकेच्या राजनैतिक संबंधांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील काही गटांनी या शिफारशींवर जोर दिला असला तरी, अमेरिकन प्रशासनाने या मागणीबाबत कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. दरम्यान, भारताच्या गुप्तचर यंत्रणांवर अमेरिकेच्या न्याय मंत्रालयाकडूनही लक्ष ठेवले जात असल्याचे दिसून आले आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये भारतीय नागरिक विकास यादव यांच्यावर अमेरिकेत भाडोत्री हत्या आणि मनी लाँड्रिंग प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. अमेरिकी न्याय मंत्रालयाच्या मते, यादव हे अमेरिकेतील शीख कार्यकर्त्याच्या हत्येच्या कटात महत्त्वाची भूमिका बजावत होते.मात्र, भारत सरकारने यादव यांच्याशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे.

यूएससीआयआरएफच्या या अहवालामुळे भारत-अमेरिका संबंधांमध्ये नवीन वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील काही गटांनी 'रॉ' वर निर्बंध लावण्याची मागणी केली असली तरी, अमेरिकन प्रशासन यावर कोणता निर्णय घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. भारताने मात्र हा अहवाल पूर्णतः फेटाळून लावत, त्याला पक्षपाती आणि दिशाभूल करणारा अहवाल म्हटले आहे.

### हवामान

कमाल : ३५ किमान : २४

आर्द्रता : ६३

### बाजार भाव

सोने : ₹९०,३८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ १,००,१०० (१किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)